# डॉ. वैशंपायन स्मृति वैद्यकीय महाविद्यालय, सोलापूर

## शरीररचनाशास्त्र विभाग

### मरणोत्तर देहदान करू इच्छिणाऱ्या व्यक्ती आणि त्यांच्या नातेवाईकांसाठी आवश्यक असलेली माहिती

देहदानाचा कायदा १९७६ (सुधारित) मुंबई ॲनॉटोमी ॲक्ट ५ (ब) प्रमाणे कोणाही व्यक्तीने आपल्या जिवंतपणी लेखी अथवा तोंडी देहदानाची इच्छा व्यक्त केली असेल किंवा व्यक्तीच्या निधनानंतर नातेवाईकांची इच्छा असेल तर मृत व्यक्तीचा मृतदेह अधिकृत वैद्यकीय संस्थेला दान करता येतो. त्याकरिता कोर्ट किंवा पोलीसांची परवानगी लागत नाही. (कॉरोनर कोर्ट परिपत्रक दिनांक २२ जानेवारी १९८७).

मृतदेहाचा उपयोग वैद्यकीय महाविद्यालयास विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी आणि संशोधनासाठी केला जातो.

**देहदान हे फार मोठे सामाजिक कार्य आहे.**

### देहदानाची इच्छा असणाऱ्या व्यक्तीसाठी नियम

(१) प्राध्यापक व विभाग प्रमुख, शरीररचनाशास्त्र विभाग, डॉ. वै. स्मृती वैद्यकीय महाविद्यालय, सोलापूर, यांचेकडून इच्छापत्राचे दोन फॉर्म मागवावेत, त्यापैकी एक फॉर्म भरून स्वतः आणून द्यावा अथवा पोस्टाने पाठवावा आणि दुसरा फॉर्म भरून आपल्या नातेवाईकाजवळ माहितीसाठी द्यावा.

(२) इच्छापत्र हे नातेवाईकावर नैतिक बंधनकारक आहे.

(३) इच्छापत्र भरलेले नसेल तरीसुद्धा देहदान करता येते. पण नातेवाईकांस आपली इच्छा लेखी कळावी म्हणून इच्छापत्र भरावे.

(४) आपल्या श्रद्धेनुसार धार्मिक विधी करूनही आपण देहदान करू शकता.

(५) देहदान रूढीविरोधी आहे पण अधार्मिक नाही.

### निधनानंतर मृताच्या नातेवाईकांचे कर्तव्य

(१) मृत व्यक्तीने इच्छापत्र भरले असेल व तुमचा विरोध असेल तरीही मृताची अंतिम इच्छा पूर्ण करा.

(२) निधनानंतर ताबडतोब डॉक्टर/वैद्य यांना बोलावून नैसर्गिक मृत्यूचा दाखला घ्यावा. त्याची एक प्रत देहदानाचे वेळेस आग्रहास सादर करावी तसेच मृत्यूनोंद प्रमाणपत्राची प्रत या कार्यालयास सादर करावी.

(३) मृतदेह दिवसा-रात्री केव्हाही स्वीकारला जाईल.

(४) शक्य तो रात्री मृतदेह आणू नका. तथापि रात्री आपण आणल्यास न्याय वैद्यक शास्त्र (फॉरेन्सीक मेडिसीन विभागाच्या शीतगृहात (शवागारात) ठेवून सकाळी शरीररचनाशास्त्र विभागाशी संपर्क साधावा.

(५) मृत्यूनंतर शक्य तो लवकर मृतदेह वैद्यकीय महाविद्यालयात आणावा कारण उशीर होऊन मृतदेहास वास यावयास लागला तर त्याचा उपयोग होणार नाही.

(६) बाहेर गावाहून मृतदेह आणण्यासाठी शासकीय नियमाप्रमाणे त्यांच्या नातेवाईकांस वाहतूक खर्च दिला जाईल.

(७) मृतदेह ठेवताना किंवा उतरताना कर्मचाऱ्यास मदत करा. तीच तुमची शेवटची सेवा समजा.

(८) मृतदेह आपण आणताना फक्त जबाबदार व्यक्तीनीच बरोबर यावे.

(९) देहदानानंतर आपणास प्रमाणपत्र दिले जाईल.

प्राध्यापक व विभाग प्रमुख,
शरीररचनाशास्त्र विभाग,
डॉ. वै. स्मृ. वै. महाविद्यालय,
सोलापूर

दूरध्वनी क्रमांक ६२१२२१
विस्तारित — ३१६, ४०७

शा. मु. वाई–१,०००–१२-२००३–ओ-११२

Scanned by CamScanner

# डॉ. वैशंपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सोलापूर
## शरीररचनाशास्त्र विभाग

### फॉर्म 'अ'
### मरणोत्तर देहदानासंबंधीचे प्रतिज्ञापत्र

मी, श्री/श्रीमती,------------------------------------------------------------वय वर्षे ..................

स्त्री/पुरुष .................. व्यवसाय............................................................मोबाईल नंबर ...............................

संपूर्ण पत्ता...............................................................................................................

.............................................................................................................................

माझ्या मृत्यूनंतर माझा संपूर्ण देह शैक्षणिक व संशोधन कार्यासाठी डॉ. वैशंपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सोलापूर, या संस्थेस स्वेच्छेने देऊ इच्छितो/इच्छिते.

मी माझ्या देहदानाची इच्छा माझ्या सद्सद्‌विवेक बुध्दीने व जाणीवपूर्वक लिहून देत आहे.

स्थळ ........................................................................ स्वाक्षरी ..............................................

दिनांक :

वरील प्रतिज्ञापत्र भरुन देताना आम्ही खाली सही करणारे साक्षीदार म्हणून उपस्थित होतो.

नांव पत्ता स्वाक्षरी

१)..........................................................................................................................

.............................................................................................................................

२)..........................................................................................................................

.............................................................................................................................

*****************

### फॉर्म 'ब'
### नातेवाईकांनी भरुन देण्यासंबंधीचे प्रतिज्ञापत्र

मी/आम्ही १) ------------------------------------------------------------ नाते ...................

२).......................................................................................................... नाते...........................

पत्ता .......................................................................................................................

........................................................................................ मोबाईल नंबर ..............................

श्री/श्रीमती ...........................................................................................................

यांनी डॉ. वैशंपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सोलापूर या संस्थेस त्यांच्या मरणोत्तर देहदानासंबंधी प्रकट केलेल्या इच्छेबद्‌दल आमची कोणत्याही प्रकारची हरकत नाही.

स्वाक्षरी

स्थळ ...................................................................... १)...................................................

दिनांक :

कार्यालयीन दूरध्वनी क्र. ०२१७-२७४९४०३/०४ २)...................................................

मोबाईल नंबर :

Scanned by CamScanner